गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक ६६ वा ● मंगळवार २३ जुलै २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 66 | Date : 23/07/2024 | blow Tuesday Page 4 Price 4


# आता सरकारी कर्मचाऱ्यांना आरएसएसच्या कार्यक्रमांमध्ये जाण्यावर बंदी नाही

## केंद्र सरकारनं ५८ वर्षांपूर्वी घातलेली बंदी उठवली

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नवी दिल्ली : केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला असून सरकारी कर्मचाऱ्यांवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अर्थात ठडड च्या कार्यक्रमांमध्ये जाण्यावर घालण्यात आलेली बंदी उठवली आहे. ९ जुलै रोजी केंद्र सरकारने घेतलेल्या या निर्णयाचा अध्यादेश भाजपाच्या मीडिया सेलचे प्रमुख अमित मालवीय यांनी त्यांच्या एक्स अकाऊंटवर शेअर केला आहे. १९६६ साली तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी यासंदर्भात निर्णय घेतला होता. ५८ वर्षांपूर्वीची ही बंदी आता उठवण्यात आली आहे. भारतीय जनता पक्षाच्या मिडिया सेलचे प्रमुख अमित मालवीय यांनी त्यांच्या एक्स अकाऊंटवर यासंदर्भातला सरकारी आदेश शेअर केला असून त्यावर सविस्तर पोस्टही लिहिली आहे. आजपासून संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होत असून त्याच दिवशी केंद्र सरकारने हा निर्णय घेतल्यामुळे त्यावरून राजकीय खडाजंगी पाहायला मिळण्याची शक्यता आहे.

केंद्र सरकारच्या कार्मिक विभागाकडून सरकारी कर्मचाऱ्यांसाठी जारी करण्यात आलेल्या या आदेशानुसार सरकारी कर्मचाऱ्यांना सहभाग घेण्यासाठी निर्बंध घालण्यात आलेल्या कार्यक्रमांच्या यादीतून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचं नाव वगळण्यात आलं आहे. त्यामुळे आता सरकारी कर्मचारी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊ शकणार आहेत.



३० नोव्हेंबर १९६६, २५ जुलै १९७० व २८ ऑक्टोबर १९८० या तीन दिवशी जारी करण्यात आलेल्या सरकारी आदेशांचा उल्लेख या आदेशात करण्यात आला आहे. दरम्यान, या आदेशाच्या निमित्ताने अमित मालवीय यांनी काँग्रेसवर तोंडसुख घेतलं आहे. ५८ वर्षांपूर्वी १९६६ मध्ये तत्कालीन सरकारने जारी केलेले कर्मचाऱ्यांना ठडड च्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यापासून रोखणारे घटनाबाह्य आदेश मोदी सरकराने । पान २ वर

## उद्धव ठाकरे हे औरंगजेब फॅन क्लबचे नेते अमित शाहांची टीका

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुणेः अमित शाह यांनी आज पुण्यातील भाजपाच्या कार्यक्रमात शरद पवार यांच्या पाठोपाठ उद्धव ठाकरे यांना लक्ष्य केले, त्यांच्यावर सडकून टीका



केली. कसाबला बिर्याणी खायला देणाऱ्या काँग्रेससोबत उद्धव ठाकरे गेले आहेत, याकुब मेननला सोडण्याची मागणी करणाऱ्यांबरोबर ठाकरे बसले आहेत, झाकिर नाईक यांना शांततादूत बवनण्यांच्या मांडीवर उद्धव ठाकरे बसले आहेत, झत्रख या संघटनेला पाठिंबा देणाऱ्यांचा मांडीला मांडी लावून उद्धव ठाकरे बसले आहेत, संभाजीनगरला विरोध करणाऱ्यांना पण हे साथ देत आहेत, यांना लाज वाटली पाहिजे अशी टीका अमित शाह यांनी यावेळी केली. राज्यात ' औरंगजेब फॅन क्लब ' म्हणजे कोण तर ते म्हणजे महाविकास आघाडी. आणि या औरंगजेब फॅन क्लबचे नेते आहेत उद्धव ठाकरे अशी बोचरी टीका अमित शाह यांनी केली.

पुण्यात गेले दोन दिवस भाजपाच्या । पान २ वर

## गुरूपौर्णिमेला स्वामी समर्थ दर्शनासाठी अक्कलकोटमध्ये भाविकांची मांदियाळी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोटमध्ये वटवृक्ष श्री स्वामी समर्थ मंदिरात आणि लगतच्या श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात रविवारी गुरूपौर्णिमेचा उत्सव मंगलमय आणि उत्साही वातावरणात साजरा झाला. यानिमित्ताने अक्कलकोट नगरीत लाखो भाविकांची मांदियाळी पाहायला मिळाली. वटवृक्ष श्री स्वामी महाराज मंदिरासह श्री स्वामी समर्थ समाधी मठाच्या परिसरात दर्शनासाठी दूर अंतरापर्यंत रांगा लागल्या होत्या. अधूनमधून कोसळणाऱ्या पावसाच्या



हलक्या सरी अंगावर झेलताना भाविकांचा उत्साह अधिकच संचारला होता. अक्कलकोटनिवासी वटवृक्ष श्री स्वामी समर्थ महाराजांना श्री दत्तात्रेयाचे चौथे अवतार मानले जाते. त्यामुळे गुरूपौर्णिमेला अक्कलकोटमध्ये श्री स्वामी समर्थ दर्शनाला वेगळे महत्व आहे. त्यादृष्टीने काल शनिवारपासूनच अक्कलकोट नगरी भाविकांनी गजबजू लागली. रविवारी भाविकांची अलोट गर्दी उसळली. अक्कलकोट शहरातील सर्व लहानमोठे रस्ते भाविकांनी । पान २ वर

## मनोज जरांगेंचा छगन भुजबळांना इशारा

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : गेल्या काही दिवसांपासून राज्यात मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा प्रश्न चांगलांच चर्चेत आहे. मनोज जरांगे पाटील



यांनी मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याची मागणी केलेली आहे. त्यासाठी मनोज जरांगे यांनी अनेकदा उपोषण केलं. त्यानंतर आता पुन्हा एकदा मनोज जरांगे यांनी जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटीत उपोषण सुरु केलं आहे. मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्यासह आदी मागण्या मनोज जरांगे यांनी केलेल्या आहेत.

आता दुसरीकडे मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्यात येऊ नये, यासाठी लक्ष्मण हाके यांनी जनआक्रोश यात्रा सुरु केली आहे. त्यामुळे आता मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा मुद्दा पुन्हा एकदा तापण्याची शक्यता आहे. मराठा आरक्षण आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावरून राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते, मंत्री छगन भुजबळ आणि मनोज जरांगे यांच्यात अनेकदा आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत. । पान २ वर

## विविध अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या एसईबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास आता सहा महिन्याची मुदत

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांना सन २०२४-२५ मध्ये विविध शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी अर्ज केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या कालावधीपर्यंत मुदत देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. त्यामुळे आता विशेषत: मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळण्यात येणाऱ्या अडचणी दूर होणार आहेत.राज्यात २० फेब्रुवारी २०२४ रोजी विशेष अधिवेशनान महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरिता आरक्षण अधिनियम (एसईबीसी) २०२४ एकमताने संमत



करण्यात आला. या अधिनियमानुसार राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशामध्ये आणि शासकीय व निमशासकीय नोकऱ्यांमध्ये सरळसेवा भरतीच्या पदांमध्ये १० टक्के आरक्षण देण्यात आले. याचा फायदा प्रामुख्याने मराठा समाजाला झाला आहे.एसईबीसी अधिनियमाचा फायदा घेऊन शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळवण्यात अडचणी येत होत्या. यामुळे एसईबीसी विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ मिळण्याची मागणी करण्यात येत होती. या मागणीचा सकारात्मक विचार करुन प्रमाणपत्र सादर करण्यास वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्याच्या सहा महिन्यापर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय मुख्यमंत्री शिंदे यांनी घेतला आहे.

## मायक्रोसॉफ्टकडून शेकडो अभियंते तैनात; बिघडलेली यंत्रणा पूर्ववत करण्याचे युद्धपातळीवर प्रयत्न

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नवी दिल्ली : मायक्रोसॉफ्टने आपल्या सायबर सुरक्षा भागीदार 'क्राऊडस्ट्राइक'मुळे झालेल्या बिघाडानंतर सेवा पूर्वपदावर आणण्यासाठी शेकडो अभियंते आणि तज्ज्ञांची फौज तैनात केली असल्याचे 'ब्लॉग'वर म्हटले आहे. १८ जुलै रोजी क्राऊडस्ट्राइकच्या अद्यायावतीकरणातील घोळामुळे जगभरातील ८.५ दशलक्ष उपकरणांवर परिणाम झाला.

जगभरातील छोटे उद्योजक तसेच विमान कंपन्यांपासून रुग्णालयांपर्यंत सर्वच जण यंत्रणा पूर्वपदावर आणण्यासाठी झगडत आहेत. जागतिक 'तंत्रकल्लोळा'मुळे भारतीय विमान वाहतूक आणि इतर विक्री उत्पादनांच्या सेवेवर मोठा परिणाम झाला. मायक्रोसॉफ्टने सांगितले की, संपूर्ण उद्योगात बिघाडाचा काय परिणाम होत आहे, याबद्दल माहिती घेण्यासाठी तसेच क्राऊडस्ट्राईक आणि ग्राहकांबरोबर सुरू असलेल्या संभाषणाची माहिती देण्यासाठी ते गूगल क्लाऊड प्लेटफॉर्म (जीसीपी) आणि ॲमेझॉन वेब सर्व्हिसेस (एडब्ल्यूएस) तसेच इतर भागधारकांबरोबर सहयोग करत आहेत. तांत्रिक बिघाडामुळे अनेक व्यवसाय आणि व्यक्तींच्या दैनंदिन व्यवहारात आलेल्या व्यत्ययाची आम्हाला कल्पना आहे. ग्राहकांची विस्कळीत झालेली यंत्रणा सुरक्षितपणे पूर्वपदावर आणण्यासाठी तांत्रिक मार्गदर्शन प्रदान करणे आमचे उद्दिष्ट असल्याचे मायक्रोसॉफ्टने ब्लॉगमध्ये म्हटले आहे. सॉफ्टवेअर क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते ही घटना जागतिक 'क्लाउड' प्रदाते, सॉफ्टवेअर प्लॅटफॉर्म, सुरक्षा आणि इतर सॉफ्टवेअर विक्रेते आणि ग्राहकांचा समावेश असलेल्या विस्तृत तंत्रज्ञान व्यवस्थेचे परस्परसंबंधित स्वरूप दर्शवते.




# संपादकीय

## ऐवढी माफक अपेक्षा..

ऑलिम्पिक म्हणजे खेळांचा महाकुंभ, विश्वातील सर्वात मोठी आणि प्रतिष्ठित क्रीडास्पर्धा. अवघ्या जगतातून एकापेक्षा एक सरस खेळाडू या स्पर्धेमध्ये कौशल्य दाखवणार आहेत. पॅरिस ऑलिम्पिक सुरू होण्यासाठी अवघे काही दिवस उरले असल्याने जगभरातल्या क्रीडा चाहत्यांची उत्सुकता वाढली आहे. पॅरिसमध्ये तिरंदाजी ही भारताची सलामीची स्पर्धा असेल. २६ जुलै रोजी उद्घाटन समारंभाच्या एक दिवस आधी ती सुरू होईल. तिरंदाजीमध्ये पाच पदके स्पर्धा होणार असून सर्वांमध्ये भारत आपली दावेदारी मांडणार आहे. भारताच्या ऑलिम्पिक कुस्ती दलात पुरुषांपेक्षा महिला कुस्तीपटूंची संख्या अधिक असेल, अशी ही पहिलीच वेळ असेल. पाच महिला कुस्तीपटू ऑलिम्पिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्याची ही पहिलीच वेळ आहे. पुरुष गटात अमन सेहरावत हा एकमेव कुस्तीपटू आहे. २००८ च्या बीजिंग ऑलिम्पिकपासून भारताने कुस्ती या खेळात प्रत्येक वेळी पदके जिंकली आहेत. या वेळी स्पर्धेत भाग घेणाऱ्या सर्व पैलवानांकडून पदकांची अपेक्षा आहे. पहिल्यांदाच भारतीय कुस्तीपटू ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकतील, अशी अपेक्षा आहे. भारतीय कुस्तीपटूंनी आतापर्यंत १९ वेळा ऑलिम्पिकमध्ये भाग घेतला आहे. त्यात त्यांनी एकूण सात पदके जिंकली आहेत. देशासाठी कुस्तीतील पहिले ऑलिम्पिक पदक खाशाबा जाधव यांनी जिंकले. १९५२ च्या हेलसिंकी ऑलिम्पिकमध्ये ५७ किलो वजनी गटात त्यांनी हे पदक जिंकले होते. भारताचा अनुभवी तरुणदीप चौथे ऑलिम्पिक खेळणार असून त्याला या वेळी रिकाम्या हाताने परतणे आवडणार नाही. महिला संघात दीपिकाकुमारी, भजन कौर आणि अंकिता भकट यांचा समावेश आहे. नेहमीप्रमाणेच दीपिका पुन्हा एकदा वैयक्तिक स्पर्धेत पदकाची दावेदार असेल. दीपिका गेल्या तीन वेळा चुकली असेल पण, आई झाल्यानंतर या वेळी तिने आत्मविश्वासाने पुनरागमन करणे कौतुकास्पद आहे. भारताच्या धनुर्विद्येच्या अपयशाचे प्रमुख कारण म्हणून आपण बरेचदा वाहत्या वाऱ्याला दोष देतो. आपल्या तिरंदाजांना जोरदार वाऱ्यात खेळण्याची सवय नाही, तर युरोपियन तिरंदाजांना वाऱ्याच्या वेगाचा फारसा फरक पडत नाही. सध्या फ्रान्समध्ये हवामान चांगले आहे. त्यामुळे 'विंड फॅक्टर'चा प्रभाव नसावा, असे वाटते. भारतीय तिरंदाजांनी गेल्या दोन वर्षांमध्ये उत्कृष्ट निकाल नोंदवले आहेत. ऑलिम्पिकमध्येही हा ट्रेंड कायम राहील अशी आशा आहे.

# ध्येयनिष्ठ कर्मयोगी पंचप्पा कल्याणशेट्टी सर

हरणा नदीच्या काठावर वसलेलं जेमतेम चार -पाच हजार लोकवस्तीचं गाव. या गावात माता गुरुबसव्वा व पिता तिप्पणा या दांपत्याच्यापोटी ४ जानेवारी १९४७ला एक पुत्र-रत्न जन्माला आला .ज्या बाळाच नांव ठेवण्यात आल पंचप्पा. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात या म्हणीप्रमाणे हे मुल जन्मापासुन जात्याच हुशार आहे हे वडिलांच्या लक्षात आले. वडिल अशिक्षित असले तरी शिक्षणाचे महत्त्व जाणून होते.शिक्षणाविषयी मनामध्ये प्रचंड आस्था व तळमळ होती.परंतु परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. चार मुली, तीन मुले असल्याने कुटुंबाचा खर्च मोठा पण त्या प्रमाणात उत्पन्न कमी व सार कांही शेतीवर अवलंबून असलेल. मुलांना शिकवलं पाहिजे ही आतंरिक इच्छा होती पण अडचण पाठ सोडत नव्हती .सरांच व दोन्ही भावंड मल्लप्पा व सिद्धप्पा यांचे प्राथमिक शिक्षण हन्नूरच्या जिल्हा परिषद शाळेत पुर्ण झाले. पण पुढील शिक्षणासाठी सोलापूरशिवाय पर्याय नव्हता. तशातच औताचं एक बैल वारलं. हल्या - बैलाची जोड करून शेती केली पण परिस्थितीपुढे हार न मानता पंचप्पा, मल्लप्पा व सिद्धप्पा या तिन्ही मुलांना शिक्षणासाठी सोलापूरला ठेवलं. मुलांना ही परिस्थितीची, वडिलांची होत असलेली ससेहोलपट तसेच शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही याची जाणीव होती. पंचप्पा सरांनी आपल एम.ए.बी. एड. पर्यंतच शिक्षण पूर्ण केलं आणि त्यांना जवळच्या चप्पळगावच्या शाळेत नोकरी लागली. कधी पायी,कधी सायकलवर असं करत सर चप्पळगावला जातं.त्यावेळी गावाला वेळेवर एस.टी. ची. सोय नव्हती.दुसरे भाऊ मल्लप्पा यांचं ही शिक्षण पुर्ण झालं आणि ते ही किणीच्या हायस्कूल मध्ये नोकरीस लागले. सरांच्या स्वभावातच समाजसेवेची ओढ असल्याने कांहीतरी आपण समाजासाठी, गावांसाठी केलं पाहिजे ही भावना सरांना स्वस्थ बसू देत नव्हती. त्यावेळी हन्नूर व परिसरातील नन्हेगाव, पितापूर, सुलतानपूर या शेजारच्या गावातील मुलां-मुलींसाठी प्राथमिक शिक्षणानंतरच्या पुढील शिक्षणाची सोय नव्हती त्यांना दूरवर पायपीट करत जावं लागायचं, पुढील शिक्षणाची सोय नसल्याने विशेष करून मुलींना इच्छा असूनही शिक्षणापासून वंचित राहावं लागायचं हे सर्व ओळखून त्या सर्वांच्या शिक्षणाची सोय व्हावी, त्यांची पायपीट थांबावी याकरिता गावातल्या समविचारी, उच्चशिक्षित मित्रांना सोबत घेऊन तसेच भरत-लक्ष्मणासारखे सावली प्रमाणे पाठीशी उभे असणाऱ्या मल्लप्पा व सिद्धप्पा या दोन भावंडांच्या मदतीने महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्थेची सन १९७०साली स्थापना केली. संस्थेच्या उद्यमेन हि सिद्ध्यंति कार्याणि न मनोरथैः या ब्रीदवाक्याप्रमाणे कामाला सुरुवात केली. पहिल्यांदा गावातील तरुणांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी यासाठी संत ज्ञानेश्वर वाचनालय (सन १९८४)सुरू केले. नंतर एका वर्षातच अनंत चैतन्य प्रशाला(सन १९८५) या नावाने माध्यमिक शाळा काढली व या भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय केली.सरांचे धाकटे बंधू सिद्धप्पा हे या शाळेत मुख्याध्यापक म्हणून रुजू झाले. या शाळेत शिकणाऱ्या गरीब, होतकरू मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या राहण्याची व जेवणाची व्यवस्था व्हावी यासाठी तक्षशिला विद्यार्थी वसतिगृह सुरू केले.आज या शाळेत ५३५ हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत असून शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मिळून २६ जण कार्यरत आहेत. या प्रशालेत नोकरीची संधी उपलब्ध करून देऊन या भागातील व गावातील गरजू सुशिक्षित बेरोजगार तरुणांचे संसार उभे केले व इथूनच सरांच्या लोककल्याणकारी कार्याला खऱ्या अर्थानं सुरूवात झाली. सर मुळात ध्येयवादी तर होतेच, सोबतच कुशाग्र बुद्धीमत्ता, प्रचंड आत्मविश्वास , जबरदस्त इच्छाशक्ती,दुरदृष्टी हे गुण अंगी असल्याने तासंतास बसुन स्वतः काम करण्याची, तसेचहाती घ्याल ते तडीस न्याया उक्तीप्रमाणे पाठपुरावा करून काम करवून घेण्याची हातोटी असल्यामुळे स्वस्थ बसतील ते सर कसले?



क्रीडांगण विकास योजना, युवकांकरिता व्यायाम शाळा, राळेगणसिद्धीच्या धर्तीवर ग्रामविकास योजना, वृक्षसंवर्धन, वृक्षलागवड करण्यासाठी रोपवाटीका, निर्मल ग्राम, निरोगी ग्राम विकास योजना,मोफत सर्वरोग निदान व चिकित्सा शिबीर, महिला समुपदेशन केंद्र, अल्पभूधारक शेतकऱ्यांकरिता मार्गदर्शन व अत्यल्प भाडेतत्त्वावर अवजारे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने कृषी सेवा केंद्र व बी-बियाणे खरेदीसाठी अर्थसहाय्य, धान्य बँक योजना , राष्ट्रीय पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्प, अवर्षणप्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम, महिला जाणीव जागृती अभियान , महिला बचतगट स्थापनेकरिता मार्गदर्शन व प्रोत्साहन अशी अनेक समाजहिताची कामे समाजसेवेचं व्रत स्वीकारलेल्या सरांनी संस्थेच्या व विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून अतिशय कार्यक्षमपणे राबविले. समाजकारणासाठी राजकारणाची जोड असावी लागते याकरिता सरांनी राजकीय क्षेत्रात ही काम केलं मात्र मिळालेल्या पदांचा उपयोग ही सरांनी समाजकार्याकरिताच केला. त्याबरोबरच सौ.सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अक्कलकोट .अनंत चैतन्य उच्च माध्यमिक विद्यालय हन्नूर, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र , नालंदा मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृह, अक्कलकोट, मातोश्री गुरुबसव्वा महिला महाविद्यालय,गिरीजामाता प्राथमिक मराठी व सेमी इंग्रजी शाळा,डे-स्कुल,योग- प्राणायाम प्रशिक्षण केंद्र,

अशा विविध शैक्षणिक विभागाच्या वतीने लहान मुलें-मुलीं,युवक-युवती, सेवांतर्गत महिला-पुरूष या सर्वांकरिता शिक्षणाची दारे खुली केली.

पण हे सर्व करता-करता आधि केले नी मग सांगितले यास तंतोतंत जुळेल असे आचरण असलेल्या, सुपारीची खांड ही न खाणाऱ्या सरांचे, आरोग्यविषयक काळजी घेण्याचे व निर्व्यसनी राहण्याविषयी सातत्याने सांगणाऱ्या सरांचे मात्र स्वतःच्या आरोग्याकडे या सर्व कामाच्या ओघात दुर्लक्ष झाले आणि सरांना एका दुर्धर आजाराने घेरले पण खचून न जाता तशाही परिस्थितीत सरांनी अखेरपर्यंत आपल्या कामात तसूभरही खंड पडू दिला नाही.अखेरच्या श्वासापर्यंत आपले काम मोठ्या हिमतींने जणू मला कांही झालेच नाही असे समजून त्याचा लवलेशही चेहऱ्यावरती कधी दिसू न देता आपले काम अविरतपणे पुर्वीच्याच ताकदीने अन जोमाने सर करतच राहिले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सरांनी १९७० साली स्थापन केलेल्या हन्नूर सारख्या खेड्यात लावलेल्या एका संस्थारुपी इवल्याशा रोपट्याचे आज वटवृक्षात रुपांतर झाले आहे.आज अनेक मुलें - मुली या वृक्षाची गोड फळे चाखत आहेत, अनेक जण या वृक्षाच्या सावलीत विसावत आहेत.ही संस्थेची धुरा आज सरांचे सुपुत्र, अक्कलकोट विधानसभा मतदारसंघांचे आमदार व संस्थेचे विद्यमान अध्यक्ष मा.सचिनदादा कल्याणशेट्टी आपल्या खांद्यावर घेऊन चुलते श्री.मल्लिनाथ कल्याणशेट्टी व श्री. सिद्धप्पा कल्याणशेट्टी या दोघांच्या विचारांने आणि मार्गदर्शनाने व त्यांच्या धर्मपत्नी सौ.शांभवीताई, बंधू मनोज,मिलन व सागरदादा कल्याणशेट्टी यांच्या साथीने व सरांनी केलेले संस्कार,त्यांची शिकवण व प्रेरणेतून अत्यंत सक्षमपणे सांभाळत आहेत व त्यांनी दाखवून दिलेल्या मार्गाने मार्गक्रमण करीत असून त्याचा आणखीन विस्तार करण्याबरोबरच सरांचे प्रत्येक स्वप्न पुर्ण करण्याचा प्रयत्न करत आहेत.

खरंच सरांच जगणं हे एका ध्येयनिष्ठ कर्मयोगी प्रमाणे होते. स्वतःसाठी जगता आलं नाही तरी इतरांसाठी जगावं, इतरांच्या डोळ्यातील अश्रू पुसताना त्यातच आपलं प्रतिबिंब पहावं या उक्तीप्रमाणे संपूर्ण आयुष्य जगलेल्या सरांना खरोखर स्वतः साठी जगताच आले नाही याची खंत माझ्यासारख्या सरांच्या संस्थेत कार्यरत असलेल्या व सरांच्या सहवासात वावरलेल्या सरांचा स्वभाव ,त्यांची काम करण्याची पद्धत, सचोटी, जिद्द, चिकाटी, मेहनत, कार्यकुशलता , क्षमता ,तत्परता पाहिलेल्या असंख्य कार्यकर्त्यांच्या मनात आजही कायम आहे.साधी राहणी, उच्च विचारसरणी यापद्धतीने जीवन समर्पित केलेल्या सरांविषयी लिहावे तितके कमी आहे. माणूस जेंव्हा एका विशिष्ट ध्येयांनी प्रेरित होतो तेंव्हा अखंड परिश्रम,त्याग,संघर्ष,तहान-भूक विसरून त्याच्यामागे कसा धावतो याच एक मुर्तीमंत प्रतीक म्हणजे कै.आदरणीय पंचप्पा कल्याणशेट्टी सर. आज त्यांच्या ८ व्या स्मृतिदिनानिमित्त सरांना विनम्र अभिवादन व सरांच्या आत्म्यास चिरशांती मिळो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**-अशोक शरणप्पा साखरे,पर्यवेक्षक**
**अनंत चैतन्य माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालय, हन्नूर.**

पान १ वरुन

## गुरूपौर्णिमेला स्वामी समर्थ दर्शनासाठी

गजबजून गेले होते. पहाटे मंदिरात श्री स्वामी महाराजांची काकड आरती झाल्यानंतर भाविकांना दर्शनासाठी मंदिर खुले झाले. पहाटेपासून भाविकांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या. सकाळी साडेअकरा वाजता आरती होऊन मंदिर समितीचे अध्यक्ष महेश इंगळे, सचिव आत्माराम घाटगे, प्रथमेश इंगळे आदींनी श्रींना महानैवेद्य अर्पण केला. मंदिराचे मुख्य पुरोहित मंदार पुजारी यांनी धार्मिक उपचार पूर्ण केले. त्यानंतर मंदिर समितीच्या महाप्रसादगृहात हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.दर्शन रांगेत भाविकांना त्रास होऊ नये म्हणून उत्तम नियोजन करण्यात आले होते. मंदिरात दर्शन सुलभतेने होण्यासाठी मंदिर समितीकडून शिस्त लावण्यात आली होती. पोलीस यंत्रणेने भाविकांच्या गर्दीचे नियोजन केले होते. अक्कलकोट शहरात वाहतूक व्यवस्था विस्कळीत होऊ नये म्हणून पोलिसांनी चांगल्या प्रकारे यंत्रणा राबविली. भाविकांच्या रांगा दूरपर्यंत गेल्या असताना मौलाली चौकात स्थानिक तरूणांनी भाविकांची सेवा केली.

गुरूपौर्णिमेनिमित्त दाखल झालेल्या भाविकांच्या प्रचंड गर्दीमुळे मंदिर समिती समिती व श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या यात्री निवास व यात्री भुवनासह इतर छोटी मोठी हाटेल, लाजेस भरून गेली होती. अक्कलकोट एसटी बसस्थानकाचे नूतनीकरणाचे काम सुरू असल्यामुळे त्या परिसरात सध्या पावसाळ्यात चिखलाचे साम्राज्य पसरले आहे. त्याचा त्रास भाविकांसह प्रवाशांना सहन करावा लागत आहे. गुरूपौर्णिमेचे औचित्य साधून अक्कलकोट भोसले संस्थानाच्या जुन्या राजवाड्यात श्री स्वामी समर्थ समर्थांच्या दुर्मीळ पादुका आणि सूर्यमणींचे खुले दर्शन घडले. दिवंगत श्रीमंत मालोजीराजे भोसले (दुसरे) यांना श्री स्वामी समर्थ महाराजांनी स्वतःच्या पादुका दिल्या होत्या. तसेच श्री स्वामी महाराजांनी स्वतः हाताळलेले सूर्यमणीही भोसले संस्थानाने जतन करून ठेवले आहे.

### मनोज जरांगेंचा छगन

आता मनोज जरांगे यांनी छगन भुजबळ यांना इशारा देत आपण येवल्यामध्ये येऊन उपोषण करु शकतो, असा इशारा दिला आहे.

छगन भुजबळ हे तिकडे येवल्यामध्ये बसले आहेत. आता मी देखील तिकडेच येवल्यामध्ये येऊन उपोषणाला बसतो. छगन भुजबळांनी मराठा समज आणि धनगर समाजामध्ये वाद लावला आहे. मी देखील तिकडे येवल्याकडे आंदोलनासाठी परवानगी काढायला सांगितली आहे. तिकडे येवल्यात उपोषणाला येतो आणि मग समजेल की उपोषण काय असतं?, असा इशारा मनोज जरांगे यांनी छगन भुजबळ यांना दिला आहे.दरम्यान, मनोज जरांगे यांनी महायुती सरकारवर हल्लाबोल करत राज्य सरकार मराठा समाजाच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करत असल्याचा हल्लाबोल केला. याचवेळी मनोज जरांगे यांनी लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांनी सुरु केलेल्या जनआक्रोश यात्रेवरही टीका केली.अमित शाह आमच्या प्रश्नांकडे कशाला लक्ष घालतील? ते मोठे लोकं आहेत, त्यांना आमची गरज नाही. जे मोठे आहेत त्यांना हे धरुन राहणार आहेत. ते शिर्डीला आले तेव्हाच त्यांनी म्हटलं होतं तुम्ही लक्ष घाला ते काहीही बोलले नाहीत. लोकांचे मुडदे पाडणारे लोक आहेत, त्यांचा चेहरा माणसाचा आहे पण आतून कपटाने भरलेले लोक आहे. त्यांचं काही खरं नाही. ते गरीबाला कधीही मोठं करु शकत नाही. त्यांना देशातल्या मोठ्या जाती संपवायच्या आहेत. महाराष्ट्रात मराठा मोठी जात आहे ती संपवायची आहे, असा आरोप जरांगे यांनी केला.

### आता सरकारी कर्मचाऱ्यांना ..

मागे घेतले आहेत. तेव्हा जारी करण्यात आलेला आदेशच मुळात चुकीचा होता. ७ नोव्हेंबर १९६६ रोजी संसद परिसरात गोहत्याविरोधी मोर्चा काढण्यात आला होता. त्यात मोठ्या संख्येनं आरएसएस व जनसंघाचे समर्थक सहभागी झाले होते. त्यावेळी अनेकजण पोलसांच्या गोळीबारात मृत्यूमुखी पडले होते. या पार्श्र्वभूमीवर हे आदेश काढण्यात आले होते, असं अमित मालवीय यांनी पोस्टमध्ये म्हटलं आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व जनसंघाच्या भीतीमुळेच इंदिरा गांधी यांनी ३० नोव्हेंबर १९६६ रोजी सरकारी कर्मचाऱ्यांना संघाच्या कार्यक्रमांत सहभागी होण्यापासून रोखलं होतं, असंही अमित मालवीय यांनी या पोस्टमध्ये नमूद केलं आहे.

दरम्यान, केंद्र सरकारच्या या निर्णयावर उद्धव ठाकरे गटानं हल्लाबोल केला आहे. आता सरकारी कर्मचारी खुलेपणाने ठडड शी संलग्न होऊन भाजपासाठी काम करू शकतील. हे निषेधार्ह आहे आता सरकारी कर्मचारी सरकारसाठी काम करताना त्यांच्या वैयक्तिक हितसंबंधांना प्राधान्य देतील, अशी टीका ठाकरे गटाच्या खासदार प्रियांका चतुर्वेदी यांनी दिली आहे.

### उद्धव ठाकरे हे औरंगजेब फॅन

राज्य कार्यकारिणीचे आयोजन केले होते. याचा समारोप केंद्रीय गृहमंत्री, भाजपाचे नेते अमित शाह यांच्या भाषणाने झाला. त्यांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांना निवडणुकीसाठी तयारीला लागण्याच्या सूचना केल्या. यावेळी पण भाजपाच्या नेत्वृत्वाखाली महायुती पुन्हा सत्तेत येईल असा विश्र्वास शाह यांनी व्यक्त केला.

# नांदकर येथे आमदारांच्या हस्ते विद्यार्थ्यांचां गुणगौरव

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

भिवंडी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील नांदकर येथे दहावी परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आमदार शांताराम मोरे यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाला नांदकर ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच मनोज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली माध्यमिक विद्यालय येथे हा गुणगौरव सोहळा घेण्यात आला.यावेळी उपस्थित आमदार शांताराम मोरे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र पेन देऊन गौरविण्यात आले.तर विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.

यावेळी आमदार मोरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. व शाळेसाठी पाच संगणक देणार असल्याचे सांगितले तसेच नांदकर येथील आदिवासी वाडीतील नागरिकांना साऊंड सिस्टीम (डी. जे.) संचाचे वाटप करून आमदार मोरे व उपस्थित मान्यवरांच्य हस्ते करून नांदकर मधील विविध भागात बसविण्यात येणाऱ्या पेव्हर ब्लॉक रस्त्यांचे भुमीपुजन करण्यात आले यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिल्हा परिषद सदस्य कृष्ण वाकडे, नगरसेवक दशरथ तरे, उपतालुकाप्रमुख भगवान जाधव, ओबीसी समीतीचे जिल्हा अध्यक्ष प्रमोद जाधव, श्रमजीवी जिल्हाध्यक्ष अशोक सापटे, किरण थळे, रवी पाटील, ऋषीकांत पाटील, सुभाष दळवी उपस्थित होते.तर सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजी सरपंच विलास जाधव, संजय शेटे, विलास थेटे, निलेश कोळी, अंकुश पाटील, सुरज खंडागळे, रोशन पाटील, आतीश जाधव, अक्षय थेटे, राम पाटील, सचीन कोनकर याचे सहकार्य लाभले.

# धोंडबे विद्यालयात शिक्षण सप्ताहाचे उद्घाटन




**दैनिक यशसिध्दि न्यूज**

निफाड : धोंडबे येथील मविप्र समाजाचे क का वाघ हायस्कूल येथे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त दिनांक २२ ते २८ जुलै या कालावधीत आयोजित करण्यात येणाऱ्या शिक्षण सप्ताहाचे उद्घाटन धोडंबे केंद्रप्रमुख व्ही डी पगार यांच्या हस्ते करण्यात आले. शिक्षण सप्ताहाच्या आजच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या अध्ययन अध्यापन साहित्याची मांडणी करण्यात आली.ह्यावेळी विद्यार्थ्यांनी त्यांनी तयार केलेल्या साहित्याची माहिती उपस्थित मान्यवरांना दिली.

साहित्यातून कल्पनाशक्तीचा विकास होऊन पाठ्यघटक लवकर समजण्यास मदत होते.या उपक्रमासाठी सर्वश्री आर आर बागुल,एस एल शिंदे श्रीमती एम बी कदम इत्यादी शिक्षकांनी परिश्रम घेतले.मुख्याध्यापक एस एम वंजारी,पर्यवेक्षक एस एस पवार, के के रकिबे,आर जी सूर्यवंशी,एस के सोनवणेबी एल शिंदे,एस बी पाटील, प्रज्योत बागुल,ठाकरे एस ए,विजय उशीर उपस्थित होते.

# युद्धनौका आयएनएस ब्रह्मपुत्राचा अपघात, १ अधिकारी बेपत्ता

मुंबई/वृत्तसंस्था : राजधानी मुंबईतील अरबी समुद्रातील विविध बंदरावरुन जहाजांची ये-जा सुरू असते. येथील काही महत्त्वाच्या बंदरावर युद्धनौकाही तैनात असतात. मुंबई हे देशाची आर्थिक राजधानी आणि महत्त्वाचं शहर आहे. त्यामुळे, युद्धनौकांच्या माध्यमतून समुद्री सुरक्षा तैनात करण्यात येते. त्यापैकीच एक असेलल्या आयएनएस ब्रह्मपुत्रा या युद्धनौकाचा समुद्रात अपघात झाल्याची माहिती आहे, या युद्धनौकामध्ये ( रविवारी आग लागल्याची घटना घडली होती. त्यानंतर, ती समुद्रातील युद्धनौका एका बाजुने झुकल्याने मोठा अपघात होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. बचाव पथक आणि संबंधित यंत्रणांकडून युद्धनौका पूर्ववत करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र, आगीच्या घटनेनंतर या युद्धनौकेवरील एक अधिकारी बेपत्ता झाल्याची माहिती असून त्यांचा शोध घेतला जात आहे. युद्धनौका समुद्र मार्गावर असताना रविवारी या युद्धनौकेवर आग लागली होती, आज पहाटे ही आग आटोक्यात आणण्यात यंत्रणांना यश आले. नौसेना डॉकयॉर्ड, मुंबई (एनडी एमबीआय) आणि बंदरगाह येथील बंदरावर असलेल्या इतर जहाँजांच्या अग्निशमन दलाने ब्रह्मपुत्रावरील आग आटोकण्यात आणण्यात मोलाची भूमिका निभावली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# गोपाळकाल्याने आषाढी यात्रेची सांगता पालख्यांचा परतीचा प्रवास सुरु

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी : गोपाळकाला गोड झाला, गोपाळाने गोड केला या जयघोषात अवघी श्रीकृष्णनगरी म्हणजेच गोपाळपूरनगरी लाखो वारकऱ्यांच्या गजराने दुमदुमून गेली. ज्ञानेश्र्वर माऊली तुकारामाच्या गजरात गोपाळपूरात मानाच्या पालख्यांसह सर्व संताच्या पालख्या दाखल झाल्या आणि गोपाळकाला केल्यानंतर श्री विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी विठ्ठल मंदीरात आल्या. मानाच्या पालख्याने श्री विठ्ठलाचे दर्शन घेतले आणि परतीचा प्रवास सुरु केला.

पोर्णिमेच्या दिवशी परंपरेनुसार गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथे मानाची अंमळनेरकर महाराजांची दिंडी काल्याच्या उत्सवासाठी पहाटे ५.०० वाजता भगवान श्रीकृष्ण मंदिरात दाखल झाली. त्यानंतर भजन झाले.

तर शेगावच्या श्री संत गजानन महाराज पालखीचे पहाटे ४.०० वाजता गोपाळपूरात आगमन झाले. पहाटेपासूनच एकामागोमाग एक अशा विविध सुमारे ४०० संतांच्या दिंड्या, पालख्या विठ्ठलनामाचा गजर करीत गोपाळपुरात दाखल झाल्या होत्या.

सकाळी ९.०० च्या सुमारास जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराजांची तर ९.३० च्या सुमारास संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्र्वर महाराजांचे पालखी सोहळे गोपाळपुरात दाखल झाले. श्री ज्ञानेश्र्वर महाराजांच्या तसेच श्री तुकाराम महाराजांच्या पादुकांचे पूजन करण्यात आले. मंदिराजवळ पालख्या विसावल्या होत्या. या पालख्यासह संत सोपानकाका, संत मुक्ताबाई, संत नामदेव महाराज, संत गोरोबा, संत एकनाथ महाराज, संत निवृत्तीनाथ महाराज, संत निळोबाराय, चांगावटेश्र्वर देवस्थान यांच्यासह अन्य संतांच्या पालख्यांचे व दिड्यांचे गोपाळपुरात आगमन झाले.

तत्पुर्वी गोपाळपुर येथील श्रीकृष्ण मंदीरात पहाटे २.३० वाजता विश्र्वस्तांच्या हस्ते पूजा करण्यात आली. पूजा झाल्यानंतर पहाटे ३.१५ वाजता श्रीकृष्ण मंदीर भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात आले. भाविकांनी मोठ्या श्रध्देने श्री गोपाळकृष्णाचे दर्शन घेऊन मंदिराला प्रदक्षिणा घातली तसेच एकमेकांना प्रेमाने लाह्यांचा काला भरवून गळाभेट घेतली. श्रीकृष्ण मंदिर समितीच्या वतीने प्रसाद म्हणून लाह्यांच्या काल्याचे वाटप करण्यात आले.

गोपाळपूर ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच उज्वला बनसोडे, ग्रामसेविका ज्योती पाटील तसेच ग्रामपंचायत सदस्य यांनी पालख्यांचे व दिड्यांचे स्वागत केले. गोपाळपूर ग्रामपंचायतीच्या वतीने स्वच्छ पिण्याचे पाणी, विद्युत व्यवस्था, हिरकणी कक्ष, प्लॅस्टिक संकलन केंद्र, तात्पुरते शौचालय, निवारा शेड आदी सुविधा वारकरी भाविकांसाठी उपलब्ध केल्या होत्या. यावेळी पोलीस प्रशासनाच्या वतीनेही चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



या सोहळ्यासाठी प्रांताधिकारी सचिन इथापे,उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, तहसिलदार सचिन लंगोटे, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले यांच्यासह संबंधित अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. गोपाळपूर येथील गोपाळ कृष्ण मंदीर समितीच्या वतीने मंदिरात आवशयक व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांचा सत्कार गोपाळ कृष्ण मंदिर समितीच्या वतीने गोपाळ कृष्ण मंदिर समितीचे अध्यक्ष दिलीप गुरव यांच्या हस्ते करण्यात आला.

**संत-देव भेटीचा सोहळा** गोपाळकाला झाल्यानंतर सर्व मानाच्या पालख्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात दाखल झाल्या व सर्व संताच्या पादुका विठ्ठल दर्शनासाठी नेण्यात आल्या.यावेळी देवाची आणि संताची अनुपम भेट घडवून आणण्यात आली. श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे दर्शन घेतल्यावर हा संतदेव भेटीचा सोहळा पार पडला. यानंतर पालख्या परतीच्या मार्गावर रवाना झाल्या. तत्पूर्वी मंदीर समितीच्यावतीने मंदीर समितीचे सदस्य ड.माधवी निगडे, संभाजी शिंदे, प्रकाश महाराज जंवजाळ, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके,व्यवस्थापक बालाजी पुदलवाड यांनी पादुकांचे पुजन व मानाच्या पालख्यांचे मानकरी यांचे उपरणे,श्रीफळ व हार देवून सत्कार केला. यावेळी यांच्यासह मंदीर समितीचे कर्मचारी उपस्थित होते.

जातो माघारी पंढरीनाथा। तुझे दर्शन झाले आता ।। म्हणत जड अंत:करणाने संताच्या पालख्यांनी व वारकऱ्यांनी परतीचा प्रवास सुरु केला.

**शुक्रवारी प्रक्षाळपूजा** पंढरपूर येथील आषाढी यात्रेत भाविकांना दर्शन देण्यासाठी श्री विठ्ठल-रुक्मिणीमाता अहोरात्र उभे असतात.या कालावधीत देवाचे नित्योपचार बंद असतात. श्री विठ्ठलाचे नवरात्र असल्याने पलंग काढण्यात आलेला असतो. त्यामुळे येत्या शुक्रवारी (ता.२६) श्रींची प्रक्षाळपूजा करण्यात येणार आहे, अशी माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

## शिवराज्य संघटना भिवंडी तालुका प्रमुख तथा अध्यक्षपदी सुनील पाटील यांची नियुक्ती




**दैनिक यशसिध्दि न्यूज**

भिवंडी/मिलिंद जाधव : भूमिपुत्र विद्यार्थी, भूमिपुत्र शेतकरी कष्टकरी कर्मचारी यांच्या न्याय, हक्कासाठी शिवराज्य संघटना शाळा वाचवा अभियानाची लढाऊ संघटनेची घोषणा केली असून शिवराज्य संघटनेच्या भिवंडी तालुका प्रमुख तथा अध्यक्षपदी टेमघर गावचे सुपुत्र सुनील पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सुनील पाटील हे सामाजिक कार्यकर्ते असून आता पर्यंत त्यांनी विद्यार्थी सर्वांगीण विकासात सक्रिय कार्य व लेखन. २००० साली तालुकास्तरीय 'उत्कृष्ट शिक्षक व केंद्रप्रमुख' पुरस्काराने सन्मानित झाले आहेत. अध्यक्ष पाईपलाईन विभागीय विद्याप्रसारक मंडळ, टेमघर संचलित माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, टेमघर, आगरी सेवा उन्नती मंडळ २४ गाव गट, भिवंडी या सेवाभावी संस्थेचे १२ वर्षे चिटणीस पदी यशस्वी कार्य. आगरी समाज उन्नती मंडळ, भिवंडी तालुका या संस्थेचे संचालकपदी कार्य. 'तू तिथं मी' हा पहिला काव्य चारोळी काव्यसंग्रह (१९९९). दुसरी आवृत्ती प्रकाशित. अभिवाचन सी.डी. लोकप्रिय. आगरी साहित्य विकास परिषद, महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष पदी २००७ पासून कार्यरत. 'तेथे कर माझे जुळती' शालेय पुस्तकाची ६वी आवृत्ती प्रकाशित. ठाणे, मुंबई, पुणे, नगर या ठिकाणी काव्यवाचनात सहभाग. आमी पकं आगरी हावं' ही आगरी कविता लोकप्रिय, काव्यसम्मेलन व जाहीर कार्यक्रमात ८८ वेळा विक्रमी वाचन. संधी विद्यार्थी घडविण्याची' हे शिक्षक संदेशरुपी काव्य महाराष्ट्रभर प्रसिध्द, २००४ मध्ये 'प्रगती वेल्फेअर ग्रुप' भिवंडी तर्फे 'साहित्य सेवा पुरस्काराने' सन्मानित. झेना साहित्य विकास प्रबोधन परिषद, धुळे येथे राज्यस्तरीय काव्यलेखन स्पर्धेत काव्यगौरव पुरस्काराने सन्मानित. महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे' शाखा भिवंडी संचालकपदी गेल्या १२ वर्षापासून कार्यरत. २०१० मध्ये 'ताराची शाळा' हा शालेय गीत संग्रह प्रकाशित २०११ मध्ये वाहळ, पनवेल येथे '१० व्या आगरी साहित्य, सम्मेलनात' कवी संमेलनाचे अध्यक्ष पद भूषविले. २०१२ मध्ये स्वरचित 'पाहिलं मी गजमुख' ही सी. डी. प्रकाशित. अलिबाग येथे '१२ व्या आगरी साहित्य संमेलनात' राज्यस्तरीय 'आगरी काव्यभूषण' पुरस्काराने सन्मानित. भिवंडीतील कवी विश्र्वास थळे यांच्या 'गुलमोहर' हा काव्यसंग्रह. बबनराव जाधव यांच्या 'सर्व काही शक्य आहे!' हे आत्मचरित्र व कॉम्रेड गोविंददात्या' या तीन पुस्तकांसाठी प्रस्तावना. जानेवारी २०१५ मध्ये झालेल्या भिवंडी आगरी महोत्सव प्रसंगी साहित्यिक क्षेत्र पुरस्काराने सन्मानित. 'तू येतोस ना...?' काव्यसंग्रह प्रकाशित (२०१५). 'तालावरची इसापगाणी' बालगिते सी. डी. प्रकाशित (२०१५) 'तिमिरातूनी तेजाकडे' हे व्यक्तिचित्रण प्रकाश वाटचालीकडे. अनेक ओबीसी आंदोलने, धरणे आंदोलने, ओबीसी आरक्षण, आंदोलनात सहभागी होऊन समाज बांधवांना प्रामाणिकपणे न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे . विद्यार्थी विरोधी, शेतकरी अन्याय विरोधी आंदोलन, जाती-जातीमध्ये बंधुभाव निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र राज्यामध्ये प्रचंड योगदान,युवकांच्या, शेतकऱ्यांच्या, कामगारांच्या तसेच शिक्षकांच्या बेरोजगारांच्या न्याय हक्कासाठी संघर्ष करत आहेत.ते स्वतः शेतकरी असल्यामुळे भूमिपुत्र समाजाबद्दल असलेले आदर ,प्रेम आणि प्रामाणिक तळमळ नेहमीच त्यांच्या कार्यातून दिसून आली आहे. म्हणूनच त्यांच्या कार्याची दखल घेऊन शिवराज्य प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संघटनेचे प्रदेशाध्यक्ष ड.रोशन पाटील, वरिष्ठ सल्लागार सीए निलेश पाटील उपाध्यक्ष विनायक वाखारे संपर्क प्रमुख डॉ. धनाजी सुरोसे, प्रवक्ते विकी कदम, सचिव हिमांशू पाटील, व संघटनेची कोर कमिटी व वरिष्ठ कार्यकर्त्यांनी मुरबाड तालुका अध्यक्षपदी सुनील पाटील यांची नियुक्ती केली आहे.

संघटनेने दिलेली जबाबदारी मी प्रामाणिकपणे पूर्ण करेल व शाळा वाचवा अभियानाला न्याय मिळवून देण्यासाठी शिवराज्य संघटनेच्या माध्यमातून प्रयत्न करेन, व संपूर्ण भिवंडी शहर व ग्रामीण भागात प्रत्येक गावात संघटनेच्या माध्यमातून युवा कार्यकर्ते तयार करून संघर्ष उभा केला जाईल व शाळा वाचवा अभियानाला न्याय मिळवून दिला जाईल असे सुनील पाटील यांनी बोलतांना सांगितले.

## विशालगड गाजापुर येथील हिंसक घटनेच्या विरोधात अक्कलकोट मुस्लिम समाजाच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधी: विशालगड च्या पायथ्याशी असलेल्या गजापूरगावातील मुस्लिमवाडी येथील दर्गा मसज्जिद व नागरी वस्तीवर हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांना अटक करून कठोर कारवाई करण्याबाबत अक्कलकोट मुस्लिम समाज कडून तहसीलदार विनायक मगर यांना निवेदन देण्यात आले.अखंड हिंदुस्तानचे प्रेरणास्थान श्री.छत्रपति शिवाजी महाराजानी अठरापगड जातींना एकत्र घेऊन ज्या पवित्र भूमीवर स्वराज्याची स्थापना केली व छत्रपती शाहू महाराजांनी ज्या राजधानीवर सर्व धर्मीय लोकांना सोबत घेऊन राज्य केले त्या महाराष्ट्राच्या पावन भूमीवर विशालगडा वरील अतिक्रमणाच्या नावावर काही समाजकंटकांनी दर्गा मस्जिद व नागरी वस्तीवर व तसेच मुस्लिम महिला पुरुष



बालकावर तलवारी व अन्य शस्त्राने अमानुष हल्ला केला वाहनाची तोडफोड करून घरे जाळली ही बाब अतिशय धक्कादायक आणि भयावह आहे हल्ले खोरांवर कायदेशीर कारवाई करून हल्ला झालेल्या वस्तीवरील नागरिकांना विशेषता महिला माता-भगिनींना संरक्षण व त्यांची नुकसान भरपाई शासनामार्फत त्वरित देण्यात यावी या मागणीची निवेदन अक्कलकोटचे तहसीलदार विनायक मगर यांना देण्यात आले.

प्रशासनातर्फे त्वरित कारवाई व नुकसान भरपाई न मिळाल्यास येत्या पंधरा दिवसात मुस्लिम समाजाकडून जन आंदोलन करण्याचा इशारा हि देण्यात आले आहे.

यावेळी आशापक बळोरगी, रईस टिनवला, एजाज मुत्वली,सद्दाम शेरिकर, निसार शेख,इरफान दावणा, हुसेन बळोरगी, समीर शेख,रशिद खिस्तके, मतीन पटेल,शोएब यळसंगी, सद्दाम शेख,सैपन शेख, अलिबाशा अत्तार, सोहेल फरास(सामजिक कार्यकर्ते), हरून जमादार, फयाज फरास,सैपन हगलदिवटे, अल्तमश, जब्बार बागवान,व मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नळदुर्ग येथील धरित्री विद्यालयातील चार विद्यार्थिनीचे राज्यस्तरीय साने गुरुजी आकलन स्पर्धेत प्रावीण्य



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे: ज्ञानदीप कलोपासक मंडळ संचलित नळदुर्ग अलियाबाद येथील धरित्री विद्यालयातील चार विद्यार्थिनींनी एस एम जोशी सोशालिस्ट फाउंडेशनद्वारे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय श्यामची आई आकलन राज्यस्तरीय स्पर्धेत चार विद्यार्थीनींनी प्राविण्य मिळवले आहे. या स्पर्धेसाठी जून महिन्यात आपला सहभाग नोंदवला होता दोन टप्प्यात ही स्पर्धा घेण्यात आली होती. श्यामची आई पुस्तक वाचून त्यावर आधारित ऑनलाइन प्रश्र्न पहिल्या टप्प्यात विचारले गेले होते. त्यात अयोध्या करदुरे, संस्कृती कदम ,वैष्णवी पवार, ज्ञानेश्र्वरी पवार इत्यादी विद्यार्थिनींनी ३० पैकी ३० गुण घेऊन पहिल्या ५० मध्ये येण्याचा मान मिळवला. यानंतर स्पर्धेची दुसरी फेरी घेण्यात आली. या फेरीत आकलनावर आधारित पुस्तकातील चिकित्सक प्रश्र्न विचारले गेले होते. त्यातही या चारही विद्यार्थिनींना ३० पैकी २५ च्या पुढे गुण प्राप्त झाले आणि उत्तेजनार्थ पारितोषिकावर आपले नाव कोरले आहे

महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त मुख्याध्यापक सुनील पुजारी यांनी या विद्यार्थिनींचा पुष्प देऊन सत्कार केला. एस एम जोशी फाउंडेशन तर्फे या विद्यार्थिनींचा सत्कार पुणे येथे २७ जुलै २०२४ रोजी एस एम जोशी फाउंडेशन सभागृहात होणार आहे. यामध्ये त्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. या विद्यार्थिनींना शाळेचे मुख्याध्यापक सुनील पुजारी यांनी मार्गदर्शन केले होते.याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक,सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.यावेळी संस्थेचे अध्यक्ष बाबुराव भाऊ चव्हाण ,सचिव ॲड सयाजी शिंदे ,कोषाध्यक्ष मल्लिनाथ माळगे ,सहसचिव वसंतराव रामदासी ,किरण पाटील ,सुभाष दासकर,नीताताई पाटील,ज्येष्ठ विचारवंत पन्नालाल सुराणा ,विलास वकील यांनी हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा दिल्या आहेत .

## नांदकर येथे आमदारांच्या हस्ते विद्यार्थ्यांचां गुणगौरव

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

भिवंडी/मिलिंद जाधव :भिवंडी तालुक्यातील नांदकर येथे दहावी परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आमदार शांताराम मोरे यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाला नांदकर ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच मनोज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली माध्यमिक विद्यालय येथे हा गुणगौरव सोहळा घेण्यात आला.यावेळी उपस्थित आमदार शांताराम मोरे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र पेन देऊन गौरविण्यात आले.तर विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.

यावेळी आमदार मोरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. व शाळेसाठी पाच संगणक देणार असल्याचे सांगितले तसेच नांदकर येथील आदिवासी वाडीतील नागरिकांना साऊंड सिस्टीम (डी. जे.) संचाचे वाटप करून आमदार मोरे व उपस्थित मान्यवरांच्य हस्ते करून नांदकर मधील विविध भागात बसविण्यात येणाऱ्या पेव्हर ब्लॉक रस्त्यांचे भुमीपुजन करण्यात आले यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिल्हा परिषद सदस्य कृष्ण वाकडे, नगरसेवक दशरथ तरे, उपतालुकाप्रमुख भगवान जाधव, ओबीसी समीतीचे जिल्हा अध्यक्ष प्रमोद जाधव, श्रमजीवी जिल्हाध्यक्ष अशोक सापटे, किरण थळे, रवी पाटील, ऋषीकांत पाटील, सुभाष दळवी उपस्थित होते.

तर सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजी सरपंच विलास जाधव, संजय शेटे, विलास थेटे, निलेश कोळी, अंकुश पाटील, सुरज खंडागळे, रोशन पाटील, आतीश जाधव, अक्षय थेटे, राम पाटील, सचीन कोनकर याचे सहकार्य लाभले.